9.3
27.2.2024

जा.क्र.मुदवसुअ/प्रा/परिपत्रक/ 162 /२०२४
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्राधिकरण, मुंबई
दि. 16/02/24

मुं. गृ. नि. व क्षे. वि. मंडळ
आवक क्र. ET- 672
दिनांक 21/02/2024

## दक्षता विभागाचे परिपत्रक -८

विषय- म्हाडाच्या मालकीच्या संक्रमण गाळ्यांमध्ये त्रयस्थ हितसंबंध निर्माण करणा-या व्यक्तीं विरोधात प्रथम खबरी अहवाल दाखल करणेबाबत.

या कार्यालयात प्राप्त काही तक्रारींचे अनुषंगाने केलेल्या चौकशीदरम्यान असे आढळून आले की, अनेक प्रकरणांमध्ये ज्या व्यक्तीस संक्रमण गाळा तात्पुरत्या स्वरुपातील निवासस्थान म्हणून वितरीत करण्यात आला त्या व्यक्तीने सदर संक्रमण गाळा अन्य व्यक्तीस परस्पर विकला. ज्यामुळे म्हाडाचे मोठे नुकसान झाले आहे.

ज्या व्यक्तीने म्हाडाचा संक्रमण गाळा अजाणतेपणे विकत घेतला आहे किंवा संक्रमण गाळ्याचे हक्क घेतले आहेत त्याचे पुनर्वसन करण्याबाबतची तरतूद गृहनिर्माण विभागाच्या दि.१३.०९.२०१९ रोजीच्या महाराष्ट्र शासन निर्णयामध्ये करण्यात आलेली आहे. तथापि ज्या व्यक्तीने जाणीवपूर्वक म्हाडाचा संक्रमण गाळा विकून म्हाडाची फसवणूक केली आहे व आर्थिक अपहार केला आहे त्यांचेविरुद्ध संबंधित पोलीस स्थानकात प्रथम खबरी अहवाल दाखल करणे आवश्यक आहे.

यास्तव या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, ज्या प्रकरणांमध्ये म्हाडाचा संक्रमण गाळा विकून किंवा त्रयस्थ हितसंबंध निर्माण करुन म्हाडाची फसवणूक झाली आहे अशा सर्व प्रकरणांमध्ये भारतीय दंड विधान मधील कलम ४०५, ४०६ अन्वये संबंधीत पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करणे अनिवार्य आहे.

सदर परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे.

AO
Circulate

(विनीत अग्रवाल)
अपर पोलीस महासंचालक तथा
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

प्रति,
मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्‌टी सुधार मंडल मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.
मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

प्रत- मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहीतीसाठी सादर
प्रत- उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांना माहीतीसाठी